| MHKO160001692024 | नियमित दिवाणी दावा क्र.४४/२०२४ मधील निशानी क्र.१५ वरील आदेश |
|---|---|

०१. वादीं यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीं यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूध्द स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट कलम २२ नुसार वाटपासाठी दाखल केला असून सदर दाव्याची चौकशी सुरू आहे. वादी यांनी सदर अर्जाद्वारे कथन केले की दाव्यातील कलम ४ मधील जनाबाई दौलु कळंत्रे असे नाव चुकुन टंकलिखित झाले असून त्याऐवजी जनाबाई दौलु पाटील असे नाव नमूद करणे गरजेचे आहे. सबब, त्यांनी वरीलप्रमाणे दाव्यातील कलम ४ मधील कळंत्रे ऐवजी पाटील अशी नावाची दुरूस्ती करणेबाबत विनंती करून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादीं यांनी सदर अर्जास वेळेत म्हणणे न दिल्याने त्यांचेविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे.

०४. मी वादीं यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूध्द स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट कलम २२ नुसार वाटपाकरीता दाखल केला असून सदर दाव्याची चौकशी सुरू आहे. वादी यांनी सदर अर्जाद्वारे दाव्याचे सरनाम्यामधील कलम ४ मधील जनाबाई दौलु कळंत्रे ऐवजी जनाबाई दौलु पाटील अशी नावाची दुरूस्ती करणेबाबत विनंती केली आहे. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे सादर न केल्याने त्यांचेविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे. वादी यांचे अर्जाचे स्वरूप पाहता तो मंजूर झाल्यास दाव्याचे मुळ स्वरूपावर कोणताही बदल होणार नाही. वादी यांची दुरूस्ती ही केवळ प्रतिवादीचे आईकडील मूळ वारसदार जनाबाई यांच्या केवळ आडनावामध्ये दुरूस्ती असल्याने सदरच्या दुरूस्तीमुळे प्रतिवादीं यांचे हक्क व अधिकारावर कोणतीही गदा येणार नाही. सदरची दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असून यामुळे दाव्याचे स्वरूपावर कोणताही परिणाम होणार नाही. सदर दाव्याचा गुणदोषावर

निकाल होण्यासाठी व सदर दाव्यात विविध निरनिराळे वाद व गुंतागुंत टाळण्यासाठी सदरची दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

**०१** अर्ज नि.१५ मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादी यांना वादपत्रामध्ये अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दुरूस्त दावा प्रत न्यायातयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Pankaj Bhimrao Pawar
Date: 2025.01.10 12:53:42 +0530

**दिनांक- ०७/०१/२०२५**

**( पी. बी. पवार )**
**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**मलकापूर-शाहूवाडी**